भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २६.०९.२०२० ते ३०.०९.२०२०)

अंक ७६/२०२० | दिनांक २५.०९.२०२० | कालावधी ५ दिवस

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१८/०९/२०२० ते २४/०९/२०२० पर्यंत) | | | | | | | | पूढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता २६/०९/२०२० ते ३०/०९/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १८/०९ | १९/०९ | २०/०९ | २१/०९ | २२/०९ | २३/०९ | २४/०९ | दिनाक | २६/०९ | २७/०९ | २८/०९ | २९/०९ | ३०/०९ |
| ८.२ | २७.९ | ८.६ | ३०.९ | १६८.६ | ६१.२ | ९.९ | पाऊस (मि. मी) | २५ | २३ | ४ | २० | १२ |
| २६.० | २९.० | ३१.० | ३१.० | २७.० | २९.० | ३१.० | कमाल तापमान (अं. से) | ३३ | ३१ | ३२ | ३३ | ३३ |
| २३.५ | २३.५ | २३.५ | २३.० | २३.५ | २३.५ | २४.० | किमान तापमान (अं. से) | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ मेघाच्छादन (ऑक्टा.) | ७ | ८ | ८ | ६ | ६ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ९६ | ९३ | ९३ | ९८ | ९८ | ९६ | ९३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९५ | ९५ | ९४ | ९४ | ९४ |
| ९८ | ८५ | ७८ | ९३ | ९८ | ७८ | ७४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७९ | ८३ | ८५ | ६७ | ६८ |
| ०.५ | ०.४ | ०.३ | ०.४ | ०.२ | ०.२ | ०.५ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००३ | ००६ | ००५ | ००४ | ००४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ वा-याची दिशा | दक्षिणे कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे |
| पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | स्थिर | स्थिर | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्य कडे | दुपार वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासूनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ४४२४.० | ४४२०.८ | ३१५.३ |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती व इशारा:**

सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये दिनांक २६ ते ३० सप्टेंबर, २०२० या कालावधी दरम्यान दिनांक २६ सप्टेंबर रोजी बहुतांश ठिकाणी मध्यम, दिनांक २७ सप्टेंबर रोजी ब-याच ठिकाणी मध्यम, दिनांक २८ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलका, दिनांक २९ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी मध्यम तर दिनांक ३० सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता आहे. त्याचबरोबर तापमानात काही अंशी वाढ होऊन हवामान आर्द्र व पूर्णतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे.

इशारा: सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून पर्जन्यासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही.

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | हळव्या जातीः- कापणी<br><br>निम गरव्या व गरव्या जातीः- फुलोरा ते दाणे भरणे | गेल्या आठवड्यामध्ये मध्यम ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस होता तसेच पुढील पाच दिवसांमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. तसेच प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून प्राप्त माहितीनुसार पुढील २ दिवस पाऊसाचा जोर कायम राहणार असुन त्यानंतर पाउसाचा जोर ओसरण्यास सुरुवात होईल त्यामुळे जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी हळव्या भात जाती काढणीसाठी तयार झालेले असल्या तरी हळव्या जातींची कापणी किमान पुढील २ दिवस पुढे ढकलण्यात यावी.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी हळव्या भात जाती काढणीसाठी तयार झालेल्या आहेत व काढणी पुढे ढकलणे शक्य नसल्यास भात पिकाची कापणी करुन पेंढ्या झाकुन ठेवाव्यात.<br>हळव्या भात जाती काढणीयोग्य झाल्या असल्यास कापणी पुर्वी ८ ते १० दिवस खाचरातील पाणी काढुन देण्याची व्यवस्था करण्यात यावी.<br>काही ठिकाणी हळव्या भाताच्या जाती कापणीसाठी तयार झालेल्या आहेत. ज्या ठिकानी भात पिक काढणीस तयार झाले असेल त्याठिकाणचे भात सकाळ ते दुपार या वेळेत जमिनीलगत कापुन १ ते २ दिवस उन्हात चांगले वाळवुन घ्यावे व नंतर शेडमध्ये साठवणुक करुन त्याची झोडपणी करावी. ऊन नसेल तर वाळविण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. भात कापणीसाठी विद्यापीठाने विकसीत केलेल्या वैभव विळ्याचा वापर करावा जेणेकरुन भात जमिनीलगत कापले जाईल.<br>कापणी करण्याच्या ८ दिवस अगोदर भातावर कोणतेही किटकनाशक/बुरशीनाशक फवारु नये वा धुरळणी करु नये.<br>जिल्ह्यामध्ये निम गरव्या व गरव्या जाती फुलोरा ते दाणे भरण्याच्या अवस्थेत आहेत. अशा ठिकाणी पाण्याची पातळी ५ ते १० से.मी. राखावी.<br>जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी गरव्या भात जाती फुलोरा अवस्थेत आहेत अशा ठिकाणी पीकास नत्र खताची तिसरी मात्रा (435 ग्रॅम युरीया प्रति गुंठा क्षेत्र) पीक फुलोरा अवस्थेत असताना पाऊसाचा अंदाज बघुन दयावी. |
| नागली | पोटरी | ढगाळ वातावरण व अधुन मधुन पडणा-या पाऊसामुळे नागलीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास आवश्यकतेनुसार नियंत्रणासाठी ट्रायसायक्लॅझोल 75 टक्के पा. मि. भुकटी 10 ग्रॅम किंवा आयसोप्रोथिऑलेन 40 टक्के प्रवाही 10 मि.ली. प्रती 10 ली पाण्यातुन संपूर्ण पीकावर फवारावे. |
| भुईमुग | फुलोरा ते आरा अवस्था | काही ठिकाणी भुईमुग पीक आरे बाहेर येण्याच्या अवस्थेत आहे. त्याची योग्य ती काळजी घ्यावी. पीकावर मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट हे किटकनाशक 10 मिली प्रती 10 ली. पाणी या प्रमाणत मिसळून फवारणी करावी.<br>भुईमुगावर टिक्का रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी कार्बेडॅझिम 10 ग्रॅम किंवा डायथेन एम-45 20 ग्रॅम प्रती 10 ली पाण्यातुन फवारावे. |
| आंबा | नवीन पालवी | पॅक्लोब्युट्राझॉल (कल्टार) दिलेल्या झाडांचे बुंधे व त्याभोवतालचा भाग बेणणी करुन अथवा ग्रामोक्झोन हे तणनाशक फवारुन तणविरहीत ठेवावेत.<br>आंब्यामध्ये नवीन पालवी आली असल्यास त्या पालवीचे तुडतुडे, शेंडा पोखरणारी अळी, पाने पोखरणारी अळी आणि मिजमाशीपासून |

| | | |
|---|---|---|
| | | अवश्यकतेनुसार संरक्षण करावे. त्यासाठी 25 टक्के प्रवाही डायमिथोएट 12 मिली किंवा 36 टक्के प्रवाही मानोक्रोटोफॉस 11 मिली प्रति 10 लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी.<br>नविन लागवड केलेल्या आंबा कलमांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास नियंत्रणासाठी नविन येणा-या पालवीवर आवश्यकतेनुसार प्रोपीनेब ०.२% (२० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा थायफिनेट मिथील ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) किंवा कार्बनडॅन्झिम ०.१% (१० ग्रॅम/१० लि. पाणी) यापैकी एका बुरशीनाशकाची आवश्यकतेनुसार फवारणी करावी.<br>आंब्यावरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड 0.3 टक्के (30 ग्रॅम/10 ली पाणी) किंवा 0.1 टक्के बोर्डो मिश्रण यापैकी एका बुरशीनाशकाची पावसाची उघडीप पाहून फवारणी करावी. फांदेमर रोगाने मोठया फांद्यांमधून डिंक येत असल्यास रोगग्रस्त साल तासून त्याठिकाणी बोर्डो मिश्रणाची पेस्ट किंवा कॉपर ऑक्सीक्लोराइडची पेस्ट लावावी.<br>आंब्यामध्ये रोगट व सुकलेल्या फांदया, बांडगुळे कापून घ्यावीत व त्या ठिकाणी 1 टक्का बोर्डो मिश्रण लावावे.<br>फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा. |
| काजु | - | काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादुर्भाव आढ्ळुन आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा.<br>काजुमध्ये काढणीनंतर जुन्या व रोगट फांद्या कापून त्या ठीकाणी १% बोर्डोमिश्रन लावावे.<br>काजुवरील फांदेमर रोगाच्या नियंत्रणासाठी फांद्या कट करुन त्यावर 1 टक्का बोर्डोपेस्ट लावावी. पाऊस संपल्यानंतर १ टक्का बोर्डो मिश्रणाची फवारणी संपुर्ण बागेत करावी.<br>अति ओलाव्यामुळे काजु पिकावर अचानक पानगळ/पानकुज आणि फांद्या वाळण्याची समस्या निर्माण झाली आहे.<br>रोगग्रस्त बागेतील रोगामुळे गळुन पडलेली पाने बागेपासुन दुर अंतरावर खोल खड्ड्यात गाड्न टाकावीत. त्याचबरोबर रोगाने बाधित झालेल्या फांद्या कापुन काढाव्यात व त्यावर त्वरीत बोर्डोपेस्टचा लेप द्यावा.<br>पानगळ/पानकुज रोग नियंत्रणासाठी मेटॅलॅक्झील ८%+ मॅन्कोझेब ६४% हे बुरशीनाशक १० लिटर पाण्यात २० ग्रॅम या प्रमाणात मिसळुन फवारणी करावी. |
| नारळ | फळ विकास | विदयापीठाने शिफारस केल्याप्रमाणे नारळाला खताचा दुसरा हप्ता 750 ग्रॅम युरीया व 660 ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश प्रती माड याप्रमाणात दयावा. खते दयावयाच्यावेळी जमिनीत पुरेसा आलावा असेल याची खात्री करावी. |
| सुपारी | फळ विकास | सुपारीवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये 1 टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| भाजीपाला | फळ धारणा | नवीन वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करावे.वेलींचे पाने खाणारी अळी, मावा इ. कीडींपासुन संरक्षण करण्यासाठी मॅलॅथिऑन २ मि.ली. किंवा डायमिथोएट १.५ मि.ली. प्रती लीटर पाण्यात मिसळुन १०-१५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| दुभती जनावरे, शेळया | - | जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ कोमट पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>जनावरांचे दिलेल्या मोठया पावसापासून योग्य ते संरक्षण करावे. गोठयामध्ये पाणी साचून देउ नये. खडडे पडले असल्यास मुरमाने बुजवून घ्यावेत<br>पशुवैदयकांच्या मार्गदर्शनाखाली शेळयांना पी.पी.आर (माथा) रोग प्रतिबंधक लसीकरण करुन घ्यावे. लसीकरणानंतर उत्तम रोगप्रतिकारक शक्ती निमार्ण होण्यासाठी चांगला आहार दयावा. |
| कुक्कुट -पालन | - | कोंबडयांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ व थंड पाण्याचा पुरवठा करावा. |

टिप - पुढिल ५ दिवसांसाठी ब-याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने पावसाची उघडीप पाहुनच किटकनाशकांची व बुरशीनाशकांची फवारणी करावी. फवारणीच्यावेळी किटकनाशक/बुरशीनाशक द्रावणामध्ये स्टीकर सारखा चिकट पदार्थ 1 मिली/1 लि. पाणी याप्रमाणात मिसळावा.

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.

| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ओफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |